## निशाणी ६८ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश १ नियम १० व आदेश ६ नियम १७ अन्वये श्री. नरेश तातुराम पाटील यांना दाव्यात प्रतिवादी क्र. ८ म्हणुन समावेश करण्याकामी व त्याअनुषंगाने अर्जात नमुद केल्याप्रमाणे कलम ११ च्या पुढे कलम ११-अ, कलम २६ च्या पुढे कलम २६-ब, कलम ३० च्या पुढे कलम ३०-अ तसेच विनंती कलम ३१ मध्ये ७-अ ते ७-क ही नविन कलमे दाव्यात दुरूस्तीने समाविष्ट करण्याकामी दाखल केलेला आहे.

२. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र. ५ ते ६ यांनी प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरूद्ध रे.मु.क्र. ८६/२०१४ दाखल केला होता. त्या दाव्यामध्ये वादी कंपनीला दाव्यात समाविष्ट करण्याचा आदेश झाल्यानंतर त्या दाव्यातील वादी व प्रतिवादी यांनी वादी कंपनीला फसविण्यासाठी तो न्यायालयातुन विना अट काढून घेतला, त्यानंतर या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रस्तावित प्रतिवादी क्र. ८ नरेश तातुराम पाटील यांना दावा मिळकतीची विक्री केलेली आहे. त्यामुळे दाव्यामध्ये नरेश तातुराम पाटील यांचा समावेश करणे आवश्यक आहे. तसेच या प्रतिवादीला दावा मिळकत विक्री केल्यामुळे त्या अनुषंगाने दाव्यात या अर्जात नमुद केल्याप्रमाणे मजकुर टाकणे आवश्यक आहे. वादी यांनी सदरचा अर्ज मंजुर करून दुरूस्ती करण्याची परवानगी देण्याची मागणी केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दि. १८.०१.२०२२ रोजी दाखल केला त्यानंतर आजपावेतो प्रतिवादी यांना म्हणणे देण्याकामी पुरेशी संधी व वेळ

दिला परंतु प्रतिवादींनी या अर्जावर म्हणणे दाखल केले नाही म्हणुन प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांचे म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आला.

४. प्रतिवादी व त्यांचे वकील गैरहजर, वादीचे वकील श्री. विकास म्हात्रे यांचा युक्तीवाद ऐकला. या अर्जातील कथनांचे व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दावा मिळकत सर्व्हे. न. १३ हिस्सा नं. २-ब (गट नं. १७१/१) ही मिळकत या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी प्रस्तावित प्रतिवादी क्र. ८ यांना रजिस्टर्ड खरेदी खताने दि. ०७. १२.२०२० रोजी विक्री केलेली आहे. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये असलेल्या वादाचे कायमस्वरूपी निराकरण होण्याकरीता प्रस्तावित प्रतिवादी क्र. ८ यांना दाव्यात समावेश करणे आवश्यक आहे. तसेच या प्रतिवादीला दाव्यात समाविष्ट केल्यानंतर तसेच झालेल्या खरेदी खताच्या अनुषंगाने वादीने या अर्जाद्वारे मागितलेल्या दुरूस्त्या या दाव्याचा व वादी प्रतिवादी मधील वादाचे कायमस्वरूपी निराकरण होण्याकरीता आवश्यक आहेत. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. श्री. नरेश तातुराम पाटील यांचा दाव्यात प्रतिवादी क्र. ८ म्हणुन समावेश करावा.

३. वादीने अर्जात नमुद असलेल्या दुरूस्त्या विहित मुदतीत कराव्यात व दुरूस्त दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

WABALE RAMDAS DAULAT
Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2022.04.21 17:34:48 +0300

**दि.२१.०४.२०२२**

**(आर.डी.वाबळे)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर,खालापूर.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a)Name of the Stenographer | : | M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b)Court | : | Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C.,<br>Khalapur |
| (c) Date of Judgment/Order | : | 21/04/2022 |
| (d) Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 21/04/2022 |
| (e) Judgment/Order uploaded on | : | 21/04/2022 |